**-: प्रेस नोट :-** **दिनांक २३/०८/२०२५**

## पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०४, मुंबई
## वडाळा टी टी पोलीस ठाणे

## गांजा विक्री करणाऱ्या दोन आरोपींना ५१ किलो ५०० ग्रॅम वजनाचा गांजासह अटक.

दिनांक २२/०८/२०२५ रोजी १४:४० वाजता पोलीस ठाणे हद्दीमध्ये गस्त करीत असताना एका पांढऱ्या रंगाच्या वॅगन आर कार क्र. MH 01 EE 3013 वर संशय आला. त्यावरून वडाळा टी टी पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने कार थांबविण्याचा प्रयत्न केला असता कार चालक हा पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना त्यांनी शिताफिने कार अडवून कारची झडती घेतली असता त्यामध्ये गांजा हा अंमली पदार्थ मिळून आला. त्यावरुन वडाळा ट्रक टर्मिनल पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ५५९/२०२५ कलम ८ (क), २० (ब) (२)(क) सह कलम २९ NDPS Act, १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमूद गुन्हयातील अटक आरोपी अबुबकर मेहंदीहसन शान व शहबाज शमीम खान यांच्याकडून पोलीसांनी एकुण ५१ किलो ५०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला असून त्याची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत १०,३०,०००/- रूपये एवढी आहे. सदर आरोपीतास दिनांक २२/०८/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली असून मा न्यायालयाने त्यांना दिनांक २५/०८/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास हा मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त कायदा व सुव्यवस्था, श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, श्री. विक्रम देशमाने, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ४, माटंगा, मुंबई, श्रीमती रागसुधा आर., मा. सहायक पोलीस आयुक्त, सायन विभाग, श्री. शैलेंद्र धिवार, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वडाळा टी. टी. पोलीस ठाणे, चंद्रकांत सरोदे व पोलीस निरीक्षक अनुराधा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक किरण नवले, पोलीस उपनिरीक्षक माधवेंद्र येवले, पो.ह. धनंजय जाधव, पो.ह. अजुमुद्दीन मिर, पो. ह. संपत गोसावी, पो. ह. रविंद्र ठाकुर, पो. ह. रमेश कुटे, पो.शि. बापु पाटोळे, पो. शि. राजू शिंदे, पो.शि. रणजित चौधरी, पो.शि. आनंद भोसले, पो.शि. विजय हनुमंते, पो.शि. नबीलाल बोरगावकर, पो.शि. शफीक शेख, पो.शि. रमेश बोरसे यांनी केली आहे.

***